महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८/ १० /२०२५

प्रति,
१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवेपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

mahasarkariyojana.in

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# शेळीपालन मार्गदर्शक सूचना

## प्रस्तावना :

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून त्याचा भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

प्रकल्प क्षेत्रामध्ये शेळी पालनाद्वारे भूमिहीन कुटुंबातील लाभार्थ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होण्याच्या दृष्टीने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत "शेळीपालन " या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

## उद्देश:

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गावांतील **भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांना** "शेळीपालन" या घटकाद्वारे पूरक उत्पन्न मिळवून देणे.
२. ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.
३. स्थानिक वातावरणात तग धरतील अशा प्रजातींच्या पैदासक्षम शेळ्यांचे संगोपन करणे.
४. ग्रामीण भागातील शेळीपालन व्यवसायास चालना मिळावी.

## लाभार्थी निवडीचे निकष

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावांतील भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिला सदर घटकासाठी पात्र राहतील.
२. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या घटकाचा लाभ देता येईल .
३. अर्जदार लाभार्थी अथवा त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांनी सदर घटकाचा लाभ इतर कोणत्याही शासकीय योजनेतून यापूर्वी घेतला असल्यास ते प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यास पात्र राहणार नाहीत.
४. भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींसाठी किमान तहसिलदार यांचेकडील भूमिहीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५. विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांना लाभ देणेसाठी सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## योजनेंतर्गत समाविष्ट घटक व अर्थसहाय्य

१. सदर घटकांतर्गत ४ शेळ्या व १ बोकड असा शेळी गट खरेदी करणे अनिवार्य आहे.

mahasarkariyojana.in

२. शेळी गट खरेदी करताना पैदासक्षम शेळ्या (दुसऱ्या व तिसऱ्या वेतातील) व पैदासक्षम बोकड (वय किमान १ वर्ष व त्यावरील) असणे आवश्यक आहे.

३. सदर घटकांतर्गत खरेदी केलेल्या शेळी गटाचा ३ वर्षांकरिता विमा उतरविणे अनिवार्य आहे.

४. सदर घटकासाठी मंजूर मापदंडाच्या ७५% अनुदान अनुज्ञेय राहील.

| अ.क्र | शेळीपालन (४ शेळ्या + १ बोकड) | | | |
|---|---|---|---|---|
| | तपशील | दर | मंजूर मापदंडानुसार खर्च रक्कम रु. | मंजूर मापदंडानुसार प्रकल्प अर्थ सहाय्याचे प्रमाण (७५ %) अनुदान |
| १ | शेळ्या खरेदी | रु. ८०००/- प्रती शेळी (उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या पैदासक्षम शेळ्या) | रु. ३२,०००/- (४ शेळ्या) | रु. २४,०००/- |
| | | रु. ६०००/- प्रती शेळी (अन्य स्थानिक पैदासक्षम शेळ्या) | रु. २४,०००/- (४ शेळ्या) | रु. १८,०००/- |
| २ | बोकड खरेदी | रु. १००००/-प्रती बोकड (उस्मानाबादी/संगमनेरी जातीचा नर) | रु. १०,००० /- (१ बोकड) | रु. ७,५००/- |
| | | रु.८०००/- प्रती बोकड (अन्य स्थानिक पैदासक्षम नर) | रु. ८,०००/- (१ बोकड) | रु. ६,०००/- |
| ३ | शेळ्या व बोकडाचा विमा | — | रु. ६,३१९ /- (उस्मानाबादी / संगमनेरी जातींसाठी) | रु. ४,७३९ /- |
| | | | रु.४,८१४ /- (अन्य जातींसाठी) | रु.३,६१० /- |
| एकूण खर्च | | — | रु. ४८,३१९/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातींसाठी) | रु. ३६,२३९/- |
| | | | रु. ३६,८१४/- (अन्य स्थानिक जातींसाठी) | रु. २७,६१०/- |

(संदर्भ :- कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सस्यव्यवसाय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक. पविआ-१०२०/प्र.क्र.११०/पदुम-३, मंत्रालय, मुंबई-३२. दि. २५ मे, २०२१)

## सर्वसाधारण सूचना

१. लाभार्थ्याकडे शेळया संगोपनासाठी पुरेशी जागा व निवाऱ्याची सोय असावी.

२. लाभार्थ्याने शेळी गटाची खरेदी ही **पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ यांचेकडूनच** करणे बंधनकारक आहे.

mahasarkariyojana.in

३. लाभार्थ्यांना उस्मानाबादी/संगमनेरी अथवा स्थानिक वातावरणात तग धरतील अशा प्रजातींच्या पैदासक्षम ४ शेळ्या व १ बोकड असा गट खरेदी करणे बंधनकारक आहे. शेळ्यांच्या प्रजातीची निवड करण्याचे स्वातंत्र्य लाभार्थ्यांना राहील.

४. सदर शेळी गटाची खरेदी ही खरेदी समितीच्या उपस्थिती मध्येच करणे अनिवार्य राहील.

५. शेळी गट खरेदी, गटाचा विमा व वाहतुकीसाठीचा खर्च लाभार्थ्याने स्वतः करावयाचा आहे.

६. खरेदी केलेल्या शेळ्यांना tagging करून त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर (NDLM-National Digital Livestock Mission) पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांच्या सहाय्याने करणे बंधनकारक राहील.

७. या घटकांतर्गत लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या शेळ्यांना लसीकरण व आवश्यक त्या पशुवैद्यकीय सेवा जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेमार्फत उपलब्ध होतील, याबाबत तालुका कृषि अधिकारी यांनी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने नियोजन करावे.

८. मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

९. मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद लाभार्थ्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात गंभीर त्रुटी आढळून आल्यास अथवा प्रकल्पांतर्गत प्राप्त लाभाचा गैरवापर केल्याचे सिद्ध झाल्यास अर्जातील आणि हमीपत्रातील अटी व शर्तीनुसार संबंधित लाभार्थ्यावर कारवाई होऊ शकते, याबाबत लाभार्थ्यास जाणीव करून द्यावी.

१०. सदर घटकाचा लाभ जास्तीत जास्त गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी घटकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-

लाभार्थी

१. इच्छुक व्यक्तींनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

२. पूर्वसंमती मिळाल्या पासून दोन महिन्याच्या आत शेळी गटाची खरेदी करावी.

३. निवडलेल्या लाभार्थ्यांनी गठीत खरेदी समितीच्या उपस्थितीत शेळी गटाची खरेदी करावी.

४. **शेळी गटाची खरेदी लाभार्थ्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ यांचेकडून करावी व खरेदी तपशिलासह पावती सादर करावी.**

५. शेळी गट खरेदीनंतर वाहतुकीचा खर्च लाभार्थीने स्वतः करावयाचा आहे.

६. या घटकांतर्गत खरेदी केलेल्या शेळी गटाचा विमा, लाभार्थी व संबधित तालुका कृषि अधिकारी यांच्या संयुक्त नावे ३ वर्षांसाठी करण्यात यावा.

७. शेळी गट खरेदीनंतर अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी करावी आणि स्वसाक्षांकित केलेली मूळ खरेदी देयके, खरेदी समितीचे प्रमाणपत्र, विमा पावती व पशुवैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र लाभार्थ्याने संकेतस्थळावर अपलोड करावे.

mahasarkariyojana.in

८. कृषि विभागाचे अधिकारी ज्या ज्या वेळी शेळी गटाच्या पडताळणीसाठी भेट देतील त्या त्या वेळी अधिकाऱ्यांना शेळया दाखविणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.
९. खरेदी केलेल्या शेळ्यांना नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून आवश्यक रोगप्रतिबंधक लसीकरण करून घेणे, त्यांना जंतनाशके पाजणे ही सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

## ग्राम कृषि विकास समिती

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावातील भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला, घटस्फोटीत महिला यांमधील गरजू लाभार्थ्यांची निवड करावी.
२. सर्व इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी करून अर्जाच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकाचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

mahasarkariyojana.in

## समूह सहाय्यक

१. इच्छुक व्यक्तींना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी व इच्छुक लाभार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी लाभार्थी निकषानुसार करणे.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करावा.
४. लाभार्थ्यांस " शेळीपालन " या घटकाच्या अटी शर्ती, तांत्रिक निकष, देय अनुदान याबाबत माहिती सांगणे.

## सहाय्यक कृषि अधिकारी

१. लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्जासोबत अपलोड केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छानणी आधारे पात्र अर्जाच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करताना निवड झालेल्या लाभार्थ्यांकडे यापूर्वी शेळ्या आहेत किंवा नाही याबाबत खातरजमा करून व मागणी रास्त असल्याची खात्री करून प्रकल्प स्थळ शेळीपालनासाठी योग्य आहे किंवा नाही, याबाबतचा अहवाल अद्यावत करावा. DBT App द्वारे प्रकल्प स्थळाचा लाभार्थी किंवा लाभार्थी प्रतिनिधी यांच्या छायाचित्रासह भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
३. लाभार्थ्याने सदर घटकाचा लाभ यापूर्वी इतर शासकीय योजनेतून घेतला आहे काय, याबाबत खातरजमा करून याबाबतचा तपशिल नमूद करावा.
४. मोका तपासणी वेळी मंडळ कृषि अधिकारी यांचे समवेत उपस्थित राहून सहाय्य करणे.
५. खरेदी समितीस सहाय्य करणे.

## उप कृषि अधिकारी

१. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.

## मंडळ कृषि अधिकारी

१. खरेदी समितीचे सदस्य सचिव या नात्याने लाभार्थी व समिती सदस्यांसमवेत समन्वय साधून नजीकच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ यांचेकडून शेळी गट खरेदी बाबत नियोजन करणे.
२. लाभार्थ्याने अपलोड केलेली देयके व अनुषंगिक कागदपत्रांची छाननी करणे.
३. लाभार्थ्याने पूर्ण केलेल्या घटकाची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मोका तपासणी करणे.
४. खरेदी करण्यात आलेला शेळी गट मार्गदर्शक सूचनेनुसार योग्य असल्याबाबत व खरेदी प्रक्रिया योग्य असल्याबाबत खातरजमा करणे. तसेच DBT App द्वारे प्रकल्प स्थळाचा अक्षांश/रेखांशासह लाभार्थी किंवा लाभार्थी प्रतिनिधी व शेळ्यांच्या छायाचित्रासह भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
५. सदर घटकाची अंमलबजावणी तांत्रिक मापदंडानुसार करण्यात आली आहे काय, याची खातरजमा करणे.
६. विहित नमुन्यातील मोका तपासणी अहवाल, अनुदानाची परिगणना करून तयार करणे.
७. प्रकल्पाच्या डीबीटी प्रणालीवरती मोका तपासणी अहवाल,देयकांची साक्षांकित प्रत ई. कागदपत्रे अपलोड करून प्रकरण पुढील डेस्क वर पाठविणे.
८. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून प्रकरण लाभार्थी स्तरावर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

mahasarkariyojana.in

## तालुका कृषि अधिकारी

१. लाभार्थ्याचा प्राप्त अर्ज, अर्जासोबत अपलोड केलेली कागदपत्रे, ग्राम कृषि विकास समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, डेस्क-२ वरील स्थळ पाहणी अहवाल व फोटो यांची छाननी करणे.
२. सदर लाभार्थ्याने अथवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने सदर घटकाचा लाभ इतर कोणत्याही शासकीय योजनेतून घेतला आहे काय, याची खातरजमा करणे. त्यासाठी पशुसंवर्धन विभागाशी समन्वय साधणे.
३. छानणी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास पूर्वसंमती प्रदान करणे.
४. खरेदी समिती प्रमुख या नात्याने खरेदी प्रक्रिया पार पाडणे कामी समन्वय साधणे.
५. छानणी अंती अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास सदर अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी त्रुटी नमूद करून डीबीटी प्रणालीद्वारे मागील डेस्क वर पाठविण्यात यावा.
६. लाभार्थी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्र ठरत नसल्यास पूर्वसंमती नाकारण्यात यावी.
७. प्रकल्प संचालक, आत्मा व उपविभागीय कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधून लाभार्थ्यांसाठी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे.

८. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे काय, याची वेळोवेळी पडताळणी करणे. तसेच विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

**खरेदी समिती :-** लाभार्थ्याने शेळी गटाची खरेदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ यांचेकडून खरेदी समितीच्या उपस्थितीत करणे बंधनकारक आहे.

**खरेदी समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.**

१. तालुका कृषि अधिकारी – अध्यक्ष
२. संबंधित तालुक्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी/पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती -सदस्य
३. कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुख -सदस्य
४. विमा प्रतिनिधी -सदस्य
५. लाभार्थी
६. मंडळ कृषि अधिकारी – सदस्य सचिव

**खरेदी समितीचे कार्य व जबाबदाऱ्या :-**

१. उस्मानाबादी / संगमनेरी किंवा अन्य जातीच्या पैदासक्षम शेळी गटाची खरेदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ यांचेकडून करण्यात यावी.
२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ यांचे समवेत समन्वय साधून लाभार्थ्यास उच्च दर्जाचा शेळी गट खरेदी करणेकामी तांत्रिक सहाय्य करणे.
३. लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष शेळी गट खरेदी केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र खरेदी समितीने सादर करावे.
४. खरेदी केलेल्या शेळ्यांना tagging करणे व त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर (NDLM-National Digital Livestock Mission) केली असल्याची खात्री करणे.
५. वाटप केलेल्या शेळया मृत झाल्यास विम्याच्या पैशातून लाभार्थ्यांना दुस-या शेळया खरेदी करणेकामी सहाय्य करावे.
६. गावातील निवडलेल्या सर्व लाभार्थ्यांनी शेळी गटाची खरेदी शक्यतो एकाचवेळी करावी.

**लेखाधिकारी**

१. मोका तपासणी अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करणे.
२. मोका तपासणी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या अनुदान रकमेची पडताळणी करून योग्य असल्याबाबत खातरजमा करणे.
३. छाननी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीसाठी शिफारस करून पुढील डेस्क वर पाठविणे.
४. छाननी दरम्यान प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

mahasarkariyojana.in

## उपविभागीय कृषि अधिकारी

१. अनुदान प्रस्तावाची संपूर्ण छानणी करून शिफारशीत करण्यात आलेले अनुदान योग्य असलेबाबत पडताळणी करणे.
२. छानणी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीस अंतिम मान्यता देणे.
३. छानणी दरम्यान प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून प्रस्ताव मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.
४. लाभार्थ्यास अनुदानाची द्विरुक्ती टाळण्यासाठी वेळोवेळी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.
५. प्रकल्प संचालक, आत्मा व तालुका कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधून लाभार्थ्यांसाठी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे.
६. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत असल्याची वेळोवेळी पडताळणी करणे. तसेच विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.
७. योजनेचे संनियंत्रण करणे.

## जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

१. जिल्ह्यामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.
३. योजनेचे संनियंत्रण करणे.

## प्रकल्प संचालक, आत्मा

१. पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने निवडलेल्या लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण घेण्यात यावे.
२. सदर प्रशिक्षणासाठी उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी समन्वय साधणे.

## विभागीय कृषि सहसंचालक:

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनांनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विभागस्तरावर सदर घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.

mahasarkariyojana.in

**क्षेत्रीय पर्यवेक्षीय तपासणी** - योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय स्तरावरून पर्यवेक्षीय तपासणी करणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणात किमान तपासणी करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी अधिकारी पदनाम | तपासणीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | तालुका कृषि अधिकारी | १० % | |
| २ | उपविभागीय कृषि अधिकारी | ५ % | |
| ३ | नोडल अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय | किमान २ प्रकरणे प्रति माह | |
| ४ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| ५ | नोडल अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| ६ | विभागीय कृषि सहसंचालक | किमान १ प्रकरण प्रति माह | |

mahasarkariyojana.in

## हमीपत्र
## शेळीपालन

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"शेळीपालन"** या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. शेळीपालन या घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल, याची मला जाणीव आहे.
२. सदर घटकाचा लाभ मी अथवा माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांनी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून घेतलेला नाही.
३. सदर घटकांतर्गतची कामे मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.
४. सदर घटकांतर्गत प्रकल्पाने मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणकापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च मी स्वत: करील.
५. सदर घटकांतर्गत खरेदी केलेल्या शेळ्या व बोकड यांचा ३ वर्षांकरिता विमा काढणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
६. सदर व्यवसाय किमान ५ वर्षे करणे बंधनकारक आहे ,याची मला जाणीव आहे.
७. अनुदानावर प्राप्त झालेल्या शेळया मृत पावल्यास मंडळ कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांना सूचित करुन नजीकच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात मृत जनावराचे शवविच्छेदन करुन घेईन व प्राप्त विमा रकमेतून शेळया खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.
८. प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी माझ्याकडून फसवणूक किंवा खोटी माहिती, कागदपत्रे दिली गेली असे आढळून आल्यास प्रकल्प व्यवस्थापन कक्षास अनुदान थांबवण्याचा किंवा वसूल करण्याचा पूर्ण अधिकार असेल.
९. मी प्रकल्पाच्या अधिकारी/प्रतिनिधींना सदर घटकाशी संबंधित प्रकल्प स्थळ, साहित्य किंवा नोंदी तपासण्यासाठी परवानगी देईन आणि पूर्ण सहकार्य करीन.
१०. मी प्रकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या घटकाचे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निर्धारित कालावधीपर्यंत देखभाल व जतन करणार असल्याची हमी देत आहे. निर्धारित कालावधीपर्यंत जतन व देखभाल न केल्यास मला दिलेले अनुदान वसूलपात्र राहील याची मला जाणीव आहे.
११. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

mahasarkariyojana.in

# खरेदी समितीने द्यावयाचे खरेदी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लाभार्थी श्री./श्रीमती-------------------------------------------------- मु.पो.----------------------------तालुका -------------------------जिल्हा --------------------------- यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत **शेळीपालन** या घटकासाठी विहित केलेल्या खरेदी समिती समक्ष दि.---------------------------रोजी --------------------------------------------------------येथे सदर घटकासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून ------- शेळ्या व ------- बोकड खरेदी करणेचे काम समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहे.

| अ.क्र. | बाब | किंमत | शेरा |
|---|---|---|---|
| १. | खरेदी केलेल्या शेळ्यांची संख्या - | | |
| २. | खरेदी केलेले बोकड संख्या - | | |
| | | एकूण किंमत | |
| | | अक्षरी रु. | |

mahasarkariyojana.in

(स्वाक्षरी) ----------------------

(स्वाक्षरी) ------------------------

(स्वाक्षरी) ----------------------

(स्वाक्षरी) ----------------------

(स्वाक्षरी) ------------------------

(स्वाक्षरी) ----------------------

# मोका तपासणी अहवाल

## (मंडळ कृषि अधिकारी यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | तपशील | | |
|---|---|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | | | |
| २. | गाव | | | |
| ३. | तपासणी दिनांक | | | |
| ४. | घटक | शेळीपालन | | |
| ५. | पूर्वसंमती क्रमांक व दिनांक | | | |
| ६. | शेळी गटाचा तपशील | **शेळी** | **बोकड** | **एकूण** |
| | • लाभार्थ्याकडील स्वत: च्या जुन्या शेळ्यांची संख्या | | | |
| | • नव्याने घेतलेल्या शेळ्यांची संख्या | | | |
| | **एकूण** | | | |
| | • नव्याने घेतलेल्या शेळीची जात | | | |
| | • नव्याने घेतलेल्या शेळ्यांचा विमा तपशील | विमा कंपनीचे नाव-<br>कालावधी- | | |
| ७. | शेळ्या व बोकड यांची खरेदी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे केली आहे काय ? | होय/ नाही | | |
| ८. | अनुदानाची गणना : (शेळी संख्या, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>• प्रकल्प उभारणीची (नव्याने खरेदी केलेला शेळी गट, विमा इ.) एकूण किंमत रु.--------<br>• लाभार्थ्यास देय अनुदान रक्कम रु. ------------------<br>(अक्षरी रु.---------------------------------------------------------------) | | | |

नव्याने खरेदी केलेला शेळी गट मार्गदर्शक सूचनांप्रमाणे असल्याची खात्री केलेली आहे. तरी संबंधित लाभार्थ्यास अनुदान **रक्कम रु.** ------------------ अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी
(श्री./श्रीमती -------------------------)

मंडळ कृषि अधिकारी
(श्री./श्रीमती. ----------------------------)
दिनांकित स्वाक्षरी

mahasarkariyojana.in

# पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री./श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री./श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री./श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | श्री./श्रीमती<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. _________ |
| ६. | घटक | **शेळीपालन** |
| ७. | देयकाची एकुण रक्कम (रु.) | |
| ८. | तपासणी अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम रु. | |
| ९. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १०. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| ११. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १२. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १३.. | शेळ्यांच्या संख्येबाबत व गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

mahasarkariyojana.in

तपासणी अधिकारी, श्री.

पदनाम

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री. पदनाम.

(स्वाक्षरी

लाभार्थी/ प्रतिनिधीची स्वाक्षरी

(नाव..........................)